सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व**
**विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११ जुलै, २०१९.**

वाचा :- १) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ , दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०७ , दिनांक ३ जुलै, २०१९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दिनांक २५ जून, २०१९.

प्रस्तावना:

वाचा क्र. १ येथे नमूद दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजीच्या अधिनियमाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नव्याने घोषित करण्यात आला असून त्यामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे.

वाचा क्र.२ येथे नमूद सन २०१९ चा अधिनियम क्र. ७ दि. ३ जुलै, २०१९ अन्वये वाचा क्र. १ येथे नमूद अधिनियमातील कलम ४ क येथे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट आरक्षण १२ % तर कलम ४ ख येथे विनिर्दिष्ट आरक्षण १३ % एवढे विहित करण्यात आले आहे.

वाचा क्र. ३ येथे नमूद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुन २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्ग कल्याण हे विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

मा. मंत्री महसुल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करणेबाबत दि. २६.६.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर योजना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या

मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे शासननिर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि. २५.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण व SEBC प्रवर्ग कल्याण हा विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सोपविण्यात आलेला आहे. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास (उदाहरणार्थ मा. मंत्रीमंडळाची मान्यता/लेखाशिर्ष/शासन निर्णय/अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध करुन घेणे इ.) किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील अपुरे मनुष्यबळ, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने लागू होणाऱ्या आदर्श आचारसंहितेमुळे विभागाकडे उपलब्ध होणारा अल्प कालावधी विचारात घेऊन SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा पहिला हप्ता संबंधित प्रशासकीय विभागानी सदर दोन्ही योजनांसाठी कार्यान्वित लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीतून अदा करावा.

३. उक्त नमूद दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा दुसरा हप्ता अदा करण्याच्या कालावधीपर्यंत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची याबाबत आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झाली तरच शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता देण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत करण्यात येईल.

४. त्याचप्रमाणे सदर दोन्ही योजनांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी आजमितीस जी यंत्रणा व कार्यपध्दती, शासननिर्णय, पात्रतेच्या अटी शर्ती अस्तित्वात आहे त्यात कोणताही बदल न करता प्रचलित यंत्रणा व कार्यपध्दतीद्वारे राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्यात यावा.

५. महाडिबीटी पोर्टलवर राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही देखील उच्च प्राधान्याने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक साकेतांक क्रमांक २०१९०७१११२१६५००१२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Vithalrao Weladi

Digitally signed by Vijay Vithalrao Weladi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c33d11360090dc60a00f603b2d1b16bd83f0256338774a947f737fede7af039, serialNumber=1e395c154c970776fc5115641f8d6663d6a765cfcf30c8d1f594706468740b6d, cn=Vijay Vithalrao Weladi
Date: 2019.07.11 13:24:10 +05'30'

**( वि.वि.वेलादी )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री, (सर्व) मंत्रालय, मुंबई.मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई

१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर

१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१९.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई

२०.संचालक, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.

२१.सर्व विभागीय आयुक्त

२२.सर्व जिल्हाधिकारी

आपण सदर योजना सर्व संबंधित विभागांकडून काटेकोरपणे राबविल्या जाईल यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

२४.समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

२५.अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जातपडताळणी समिती (सर्व)

२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

२७.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल) तथा उपविभागीय दंडाधिकारी

२८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी

२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई

३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा , मुंबई

३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- नागपूर

३२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- नागपूर

३३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- औरंगाबाद

३४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- औरंगाबाद

३५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

३६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

३७. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३८. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३९.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

४०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे

४१.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे

४२.मंत्री, (महसूल), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

४३.मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मान्यता प्राप्त आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत लाभ देण्याकरिता पात्रतेसाठी कुटूंबाची वार्षिक आर्थिक मर्यादा रुपये ६ लाख करणे व प्रचलित योजनेची व्याप्ती वाढविणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय :- एमईडी १०१६/प्र.क्र.४७३/१६/शिक्षण २**
शिबीर कार्यालय, बॅरेक क्र. ३, हैद्राबाद हाऊस, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१.
**दिनांक : ०९ डिसेंबर, २०१६**

**वाचा :**

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिईएम २००६/(३५३/०६)/तांशि १, दिनांक २१/०३/२००७
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ईबीसी २००८/(२३६/०८)/तांशि ४, दिनांक २६/०२/२०१०
३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ईबीसी २०११/प्र.क्र.७४/मशि-२, दिनांक २५/०५/२०१२
४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिईएम २०१५/प्र.क्र. २१९/तांशि ४, दिनांक ३१/०३/२०१६
५) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमईडी २०१५/प्र.क्र. १२८/शिक्षण २, दिनांक ३१/०३/२०१६
६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टिईएम २०१६/प्र.क्र. ३२५/ तांशि ४, दिनांक २०/०७/२०१६
७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीईएम २०१६/प्र.क्र. ५०१/तांशि ४, दिनांक १३/१०/२०१६

**प्रस्तावना:-**

सध्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये १ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी “राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना” अंतर्गत खाजगी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के

मर्यादेपर्यंतच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. या योजनेंतर्गत एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.यू.एम.एस. बी.पी.टी.एच.,बी.ओ.टी.एच. आणि नर्सिंग या आरोग्य विज्ञानाच्या विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित झालेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती करण्यात येते.

२. तसेच, शासकीय व अनुदानित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये १ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी देखील स्वतंत्रपणे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

३. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता वरील नमूद आर्थिक निकष विचारात घेऊन सद्य:स्थितीत या घटकातील विशेषत: गुणवंत विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी विशेष उपाय योजना करणे शासनाच्या विचाराधीन होते.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये (खाजगी अभिमत/ स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालये यामधील शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियद्वारे प्रवेश घेणारे ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरिता (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) त्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १.०० लाख वरुन ६.०० लाखापर्यंत वाढविण्याची व प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची व्याप्ती विस्तारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

५. तसेच, सध्या वैद्यकीय शिक्षण संचालनालयाच्या आणि आयुष संचालनालयाच्या अखत्यारितील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना विद्यार्थी शासकीय व अनुदानित महाविद्यालय यांना प्राथम्य/ पसंती देऊन प्रवेशासाठी उत्सुक असतात. त्यानंतर सदरहू विद्यार्थ्यांना खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी कल असल्याचे दिसते. म्हणजेच जास्तीत जास्त गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी हे शासकीय/अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेऊनही विशेषत: आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता प्रचलित निकषानुसार आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना अल्पप्रमाणात शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते. परंतु प्रचलित राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंअतर्गत खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयांना त्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती करण्यात येते.

यामुळे वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या अखत्यारितील शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न हे रुपये २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के पर्यंतची प्रतिपूर्ती शासनाकडून संबंधित महाविद्यालयांना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

६.	तसेच, प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या निवडक आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालयांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख ते रुपये ६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी इयत्ता १२ वी च्या परीक्षेमध्ये आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता १२ वी च्या परीक्षेमध्ये एकत्रित किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शिक्षण शुल्कांच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

७.	याशिवाय या विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसिन अ‍ॅण्ड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस. (बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या पदवी अभ्यासक्रमांसाठीचे शिक्षण हे आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरील असल्यामुळे गुणवान विद्यार्थी यापासून वंचित राहू नयेत म्हणून केवळ या अभ्यासक्रमांसाठी खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठ व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेशद्वारे प्रवेश घेणाऱ्या (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखापेक्षा जास्त व रुपये ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी च्या परीक्षेमध्ये एकत्रित किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस अदा करण्याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता.

८.	तसेच, सध्या शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना" या ऐवजी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"या नावाने संबोधण्याचे प्रस्तावित होते.

९.	याशिवाय शासनाने निर्धारित केलेल्या आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालये यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यापैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" सुरु करण्याचे प्रस्तावित होते. सदर योजनेंतर्गत वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या वसतीगृहातील खर्च भागविण्यात सहाय्य व्हावे याकरिता या प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी राज्यातील महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) वसतिगृहांमध्ये प्रवेशित आहेत त्या विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमाह रुपये ३०००/- व अन्य ठिकाणी असलेल्या वसतिगृहांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी

प्रतिविद्यार्थी प्रतिमाह रुपये २०००/- इतका निर्वाह भत्ता (Hostel Maintenance Allowance)देण्याचे प्रस्तावित होते.

१०. उपरोक्त बाबी विचारात घेऊन मंत्रिमंडळाने दिनांक १३/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संदर्भाधीन क्रमांक ७ वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासंदर्भात पुढीलप्रमाणे सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**:-

१. प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी एम.बी.बी.एस. व बी.डी.एस. या अभ्यासक्रमांसाठी खालील अनुक्रमांक "(२)"येथे प्रस्तावित केल्याप्रमाणे व उर्वरित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय व शासन अनुदानित व खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत/ स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून) व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये यामध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या व चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख ते रुपये ६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यापैकी जे विद्यार्थी इयत्ता १२ वी नंतरच्या आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी इयत्ता १२ वी च्या परिक्षेमध्ये एकत्रितपणे किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत असे गुणवंत विद्यार्थी आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी अभ्याक्रमांकरिता प्रवेश घेतील आणि संबंधित अभ्यासक्रमाकरिता असणाऱ्या केंद्रीय परिषद आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता विहित केलेले निकष पूर्ण करतील त्याच विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील/ संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थी वगळून) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमांसाठी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या विभागाच्या अखत्यारितील एम.बी.बी.एस. (बॅचलर ऑफ मेडिसि अ‍ॅण्ड बॅचलर ऑफ सर्जरी) व बी.डी.एस.(बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी) या अभ्यासक्रमांसाठी शासकीय, अनुदानित आणि खाजगी विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठ व स्वयंअर्थ सहाय्य विद्यापीठ वगळून) महाविद्यालयांमध्ये शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या व चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यापैकी ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखपेक्षा जास्त व रुपये ६ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यापैकी ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी च्या परीक्षमध्ये एकत्रितपणे किमान ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले आहे अशा गुणवंत विद्यार्थ्यांना (व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थी वगळून) त्यांच्या प्रवेशित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेले शैक्षणिक शुल्क

महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस अदा करण्यास ही शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रचलित राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये (खाजगी अभिमत/स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठे वगळून)आणि शासकीय, शासन अनुदानित व शासकीय विनाअनुदानित महाविद्यालय (शासकीय अभिमत विद्यापीठासह) शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणारे ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरिता (व्यवस्थापन कोटयातील/ संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) त्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १.०० लाख वरुन २.५० लाख करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

४. तसेच, प्रचलित राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनांतर्गत शासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेणाऱ्या ईबीसी धारक विद्यार्थ्यांना देखील सध्या अल्प दराने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती ऐवजी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनांतर्गत खाजगी कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी प्रतिपूर्ती करण्यात येईल. या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि आयुष संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सदर योजनेची अंमलबजावणी ही वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्यामार्फत करण्यात येईल.

५. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि आयुष संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांमधील ईबीसी धारक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीच्या प्रचलित योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या कुटूंबाची (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न मर्यादा ही रुपये १ लाखावरुन रुपये २.५० लाख इतकी करण्यात येत आहे.

६. सध्या शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या "राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"या ऐवजी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"या नावाने संबोधण्यात येईल.

७. शासनाने निर्धारित केलेल्या आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्याक्रमांना शासकीय, शासन अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभूधारक शेतकरी आहे किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांकरिता "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"या नावाने योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वरील निकषांची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी राज्यातील महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) प्रवेशित आहेत. त्या

विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमाह रुपये ३०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमाह रुपये २०००/- इतका वसतिगृह निर्वाहभत्ता (Hostel Maintenance Allowance) देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निर्वाहभत्ता हा शैक्षणिक वर्षातील सुट्टीचा कालावधी वगळून उर्वरित १० महिन्यांच्या कालावधीकरिता अनुज्ञेय असेल.

८. वरील नमूद "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा" लाभ हा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक व वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसह जे विद्यार्थी वरील अटींची पूर्तता करतील अशा सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल.

९. या योजनेंतर्गत पात्र असणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी महाविद्यालयाच्या संबंधित अभ्यासक्रमांकरिता शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाने (शासकीय संस्थाकरिता शासनाने) निर्धारित केलेले शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्केच्या मर्यादेपर्यंतचे शुल्क आकारण्यात यावे व उर्वरित ५० टक्के शुल्काची शासनाकडून या योजनेंतर्गत प्रतिपूर्ती संबंधित शैक्षणिक संस्थेस करण्यात येईल.

१०. वरील सुधारित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांपैकी किमान ५० टक्के इतक्या प्रवेशित लाभार्थी विद्यार्थ्यांना नोकरीची संधी (Placement) मिळवून देण्यास संबंधित महाविद्यालय प्रयत्नशील राहतील व याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती दरवर्षी एकत्रितपणे योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करतील.

११. तसेच, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत मंत्रिमंडळाने यापूर्वी दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक ३१ मार्च,२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांनी त्याचे विहित मूल्यांकन/दर्जा निश्चितीकरण संस्थांमार्फत (NAAC, NBA, इ.सारख्या) मूल्यांकन करुन घेणे आवश्यक असते, तसेच वरील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अन्य अटी व शर्ती पात्र लाभार्थी, शैक्षणिक संस्था आणि योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम संनियंत्रण अधिकारी/यंत्रणाकरिता लागू असतील.

१२. शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती/प्रतिपूर्ती योजनांची प्रभाविपणे व पारदर्शक पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी ऑनलाईन संगणकीय प्रणाली विकसित करावी. तसेच, या अनुषंगाने यापूर्वी विभागाने संदर्भ क्र.६ अन्वये दिनांक २०/०७/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील सूचनेनुसार योजनेच्या सबंधित संनियंत्रण अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी.

१३. या शासन निर्णयातील नमूद योजनांकरिताचे निकष, अटी व शर्ती हे केवळ वरील "नवीन राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजनेकरिता लागू राहतील.

**शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपध्दती :-**

१४. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने आरोग्य विज्ञानाच्या शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र लाभार्थींचे अर्ज स्विकारण्यासाठी संगणकीय ऑनलाईन प्रणाली निर्माण करुन आवश्यकतेनुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे विद्यार्थी व संस्थेशी संबंधित सर्व बाबींची वरील संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी याकरीता सर्व उक्त विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

१५. प्रत्येक प्रवर्गातील अर्जदार विद्यार्थ्यांकरीता निश्चित केलेल्या त्यांच्या कुटुंबांची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

१६. तसेच सक्षम प्राधिकरणांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्यांने सादर करणे आवश्यक राहिल.

१७. प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या/वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीद्वारे खातरजमा करुन त्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक राहिल.

१८. प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक तसेच प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

१९. सक्षम प्राधिकाऱ्यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विद्यार्थ्यांची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

२०. पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधारक्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नित झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

२१. ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश हा प्रवेश नियामक प्राधिकरण व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांला व पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२२. अशा पात्र विद्यार्थ्यांची विहीत मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

२३. वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

